# महाराष्ट्र विधानपरिषद

**द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२४**

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

## नागपूर जिल्ह्यात आयुष्यमान भारत आरोग्य योजनेचे कार्ड मिळण्यासाठी येणाऱ्या तांत्रिक अडचणी दूर करण्याबाबत

**(१) २१३२७ (०५-०१-२०२४) श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आयुष्यमान भारत आरोग्य योजनेतून संसर्गजन्य आजार, सिकलसेल, थैलेसेमिया, क्षयरोग अशा रोगांना सुरक्षा कवच मिळणार असून नागपूर जिल्ह्यात आयुष्यमान आरोग्य योजनेंतर्गत १३,९९,७३७ लाभार्थी असून अद्यापपर्यंत फक्त अंदाजे ४ लाख व्यक्तींना आयुष्यमान भारत योजनेचे कार्ड प्राप्त झाल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयुष्यमान भारत योजनेचे कार्ड मिळण्यासाठी येणाऱ्या तांत्रिक अडचणी दूर करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१७-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे.

आयुष्यमान भारत-प्रधान मंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत नागपूर जिल्ह्यातील ४,०६,९०३ लाभार्थी कुटुंबे असून त्यामध्ये १३,९९,७३७ इतके लाभार्थी आहेत. नागपूर जिल्ह्यात माहे सप्टेंबर, २०२३ पर्यंत ४,०४,२६१ एवढया लाभार्थ्यांचे आयुष्मान कार्ड निर्माण करण्यात आले आहे.

(२) आयुष्मान कार्डाचे निर्माण व वितरणाची गती वाढविण्याकरीता राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाकडून BIS २.० ही सुधारीत संगणक प्रणाली २८ ऑगस्ट, २०२३ पासून राज्यात लागू करण्यात आली आहे. त्यानुसार आयुष्यमान कार्ड काढण्याची प्रक्रिया सुलभ करण्यात आली आहे. आयुष्मान कार्ड काढण्यासाठी https://beneficiary.nha.gov.in या संकेतस्थळाद्वारे किंवा आयुष्मान ॲप मार्फत आयुष्मान कार्ड निर्माण व डाऊनलोड करायची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर संकेतस्थळावर किंवा ॲपमध्ये आधार संलग्नित ई-केवायसी केल्यावर आयुष्मान कार्ड डाऊनलोड करता येते. मोबाईल ॲप किवा संकेतस्थळाव्दारे जे लाभार्थी ई-केवायसी करतील त्यांना आशा सेविकेमार्फत आयुष्मान कार्ड घरपोच दिले जाणार आहे.

आयुष्मान कार्ड निर्मिती करण्याकरीता राज्यातील आशा सेविका, आपले सरकार सेवा केंद्र तसेच स्वस्त धान्य दुकानचालक यांचे ऑपरेटर लॉगीन बनविण्यात आले असून त्यांचेमार्फत लाभार्थ्यांची कार्ड निर्मिती करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे वैयक्तिक लाभार्थी सुद्धा आयुष्मान ॲप मध्ये Beneficiary Login पर्यायाचा वापर करुन आयुष्मान कार्ड तयार करु शकतात.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वर्धा जिल्ह्यातील आठ तालुक्यांतील जनावरांना लम्पी आजाराची लागण होऊन ५४ जनावरांचा मृत्यू झाल्याबाबत

**(२) २१५८० (०३-०१-२०२४) श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्ह्यातील आठही तालुक्यात ११०९ जनावरांना लम्पी आजाराची लागण होऊन त्यापैकी ५४ जनावरे मृत्यू झाल्याचे दिनांक माहे सप्टेंबर, २०२३ रोजी निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लम्पी आजारावर आळा घालण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१३-०२-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) शासन अधिसूचना दिनांक १७/०६/२०२२ अन्वये जिल्हाधिकारी यांना लम्पी चर्मरोगाच्या अनुषंगाने अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी यांनी दिनांक २०/०९/२०२२ रोजी निर्गमित अधिसूचनेद्वारे पशुधनाची वाहतूक व बाजार नियंत्रित केले होते.

वर्धा जिल्ह्यातील २,८५,८८० गोवंशीय पशुधानापैकी २,७२,३३९ (९५.२६ टक्के) पशुधनास मोफत लसीकरण करण्यात आले आहे. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांनी प्रसारित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार बाधित पशुधनावर मोफत उपचार तसेच, किटकांचे नियंत्रण आणि गोठ्यांचे निर्जंतूकिकरण करण्यात आले आहे.

---

## अलिबाग (जि.रायगड) येथील सांबरकुंड मध्यम प्रकल्पाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(३) २१५९५ (०४-०१-२०२४) श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १९९५९ ला दिनांक १७ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) २४ गावांना पाणीपुरवठा करण्यासाठी रामराज, महाण परिसरात सांबरकुंड मध्यम प्रकल्पाच्या ११.७१ कोटींच्या मूळ अंदाजित खर्चाला शासनाने दिनांक २८ सप्टेंबर १९८२ रोजी मंजुरी दिलेली असतानाही प्रकल्पाची ४१ वर्षे प्रलंबित असल्याने प्रकल्पाचा खर्चात सुमारे ६३.३६ टक्के वाढ झाली असून प्रकल्पाचा खर्च थेट ७४२ कोटी रुपयांवर गेला तरी ही प्रकल्पाच्या कामास आजमितीस सुरुवातच झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २८ सप्टेंबर, १९८२ रोजी या सांबरकुंड मध्यम प्रकल्पाच्या कामासमंजुरी प्राप्त झाल्यानंतर प्रकल्प उभारण्यासाठी आवश्यक हालचाली झाल्या नाहीत, त्यानंतर १३ वर्षांनी १९९५ मध्ये २९.७१ कोटी रुपये खर्चाची सुधारित मान्यता घेण्यात आली त्यानंतर ऑक्टोबर, २००१ मध्ये ५०.४० कोटींची तृतीय मान्यता घेण्यात आली, त्यानंतर २०१२-१३ मध्ये ३३५.९३ कोटी रुपयांचे प्रस्तावित अंदाजपत्रक तयार करण्यात आले, त्यानंतर दिनांक ६ मे, २०२० रोजी पाचवी मान्यता घेण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू, प्रकल्पाचे काम मागील ४१ वर्षाहून अधिक कालावधी उलटूनही अलिबाग शहरासह २४ गावे नाहक तहानलेलीच राहिली आहेत, सदर प्रकल्पामुळे बाधित जांभुळवाडी, सांबरकुंडवाडी व खैरवाडी यांचे पुनर्वसन मौजे रामराज, ता.अलिबाग मधील राजेवाडी येथे प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन प्रस्तावित असून त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) प्रकल्पाची मूळ प्रशासकीय मान्यता व्यपगत झाल्याने प्रकल्पास सन १९९५ व सन २००१ मध्ये नव्याने प्रशासकीय मान्यता देण्यात आली व त्यानंतर जलसंपदा विभाग शासन निर्णय दिनांक २५/०६/२०२० अन्वये रुपये ७४२.८८ कोटी रकमेस सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
(३) प्रकल्पाचा पुनर्वसन आराखडा उविका/ कात २/भुसंपादन/ सांबरकुंड पुनर्वसन/आराखडा/ कावि २५०/२०२३, दिनांक २४/०३/२०२३ अन्वये जिल्हाधिकारी रायगड यांना सक्षम स्तरावरील मान्यतेच्या कार्यवाहीसाठी सादर केला असून मान्यतेनंतर नागरी सुविधांची कामे पूर्ण करुन पुनर्वसनाची कार्यवाही पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

२६३.५४ हेक्टर वनजमीन हस्तांतरणासाठी आवश्यक तत्त्वतः मान्यतेचा प्रस्ताव विभागामार्फत वनविभागास दिनांक १८/११/२०२२ रोजी सादर करण्यात आलेला असून त्यावर मिनिस्ट्री ऑफ एन्व्हायरमेंटल ॲण्ड फॉरेस्ट डिपार्टमेंट, नवी दिल्ली यांचे मार्फत दिनांक ०१/११/२०२३ रोजी उपस्थित केलेल्या शेऱ्यांचा शेरेपूर्तता अहवाल दिनांक १४/१२/२०२३ अन्वये केंद्र शासनास सादर केलेला आहे. केंद्र शासनाने दिनांक ०३/०१/२०२४ च्या पत्रान्वये बाधित वनक्षेत्र पाहणी करण्याबाबत कळविले आहे. वनक्षेत्र पाहणी नंतर वनजमीन संपादनाची पुढील कार्यवाही करण्यात येईल.

प्रकल्पासाठी आवश्यक वन जमीन हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच प्रकल्पाचे बांधकाम सुरू करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्याच्या विकासदरात वाढ करुन प्रकल्प पूर्ण करण्याबाबत

**(४) २१७२५ (०४-०१-२०२४) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.निलय नाईक, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या विकासदरात वाढ करावयाची असल्याने पायाभूत सुविधांचे महत्त्वकांक्षी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी तसेच कृषी आणि कृषी पूरक उद्योगाबरोबरच उद्योग ऊर्जा आदी महत्त्वाच्या क्षेत्रांचा कार्य विस्तार करण्याच्या सूचना मा.उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन यांनी विविध विभागांना दिले असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्याच्या अर्थव्यवस्था एक ट्रिलियन करण्यासाठी राज्यात रस्ते, बंदरे, विमानतळ, ऊर्जा निर्मिती, शिक्षण, आरोग्य, पर्यटन आदि क्षेत्रात पायाभूत सुविधा निर्माण करताना शेतीपूरक उद्योग उत्पादन व सेवा क्षेत्राला शासन प्रस्ताव देणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणता कृती आराखडा तयार केला वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (१६-०१-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) राज्य आर्थिक सल्लागार परिषदेने दिनांक १२/०७/२०२३ रोजी परिषदेचा अहवाल शासनास सादर केला. सदर अहवालामध्ये विविध क्षेत्रांबाबत शिफारशी केल्या आहेत. अहवालातील शिफारशी सर्व संबंधित विभागांना दिनांक २० सप्टेंबर, २०२३ रोजीच्या अर्ध शासकीय पत्राद्वारे आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्या आहेत. सदर अहवालावर कार्यवाही करण्यासाठी दिनांक ०६/०९/२०२३ च्या शासन निर्णयान्वये मा.मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली शीघ्र कृती समिती स्थापन करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोकण किनारपट्टीवरील मच्छिमार बांधवांना पावसाळी मासेमारी बंदी कालावधीत खावटी अनुदान देण्याबाबत

**(५) २१७७७ (०३-०१-२०२४) श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रा.राम शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कोकण किनारपट्टीवरील मच्छिमार बांधवांना पावसाळी मासेमारी बंदी कालावधीत खावटी अनुदान देण्याची मागणी कोळी महासंघाने लोकप्रतिनिधीच्या माध्यमातून दिनांक २४ ऑगस्ट, २०२३ रोजी मत्स्यविकास मंत्री महोदय यांच्याकडे निवेदन केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय, या अहवालानुसार मासेमारी बंदी कालावधीत खावटी अनुदान मच्छिमार बांधवांना देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (०५-०२-२०२४) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
केंद्र शासनाने पश्चिम किनारपट्टीवरील सर्व राज्यांना दिनांक १ जून ते ३१ जुलै असा एकूण ६१ दिवसांची मासेमारीस बंदी लागू केले आहे. त्याप्रमाणे सदर कालावधी हा मासेमारी बंदी कालावधी म्हणून

घोषित केला आहे. मासेमारी बंदी कालावधी दरम्यान मच्छिमारांना उदरनिर्वाहाकरीता (क्रियाशील मच्छिमारांकरीता राष्ट्रीय कल्याणकारी बचतीसह मदतीची योजना) केंद्र शासन हिस्सा रुपये १५००/-, राज्य शासन हिस्सा रुपये १५००/- व लाभार्थी हिस्सा रुपये १५००/- असे एकूण रुपये ४५००/- अर्थसहाय्य देण्यात येते. तसेच बंदी कालावधीमध्ये मच्छिमारांना शिधा (राशन) खरेदी करण्यासाठी जिल्हा बँकेकडून मदत दिली जाते. परंतु खावटी स्वरूपात कर्ज दिले जात नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आदिवासी समाजाच्या व्यक्तींची जमीन खरेदी-विक्री प्रतिबंधित असताना प्रशासन परवानगी देत असल्याबाबत

**(६) २१८२९ (०३-०१-२०२४) श्री.आमश्या पाडवी, श्री.सचिन अहिर, ॲड.अनिल परब, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासीची जमीन बिगर आदिवासींना खरेदी करता येत नाही, अशी संविधानिक तरतूद असतानाही नंदुरबार जिल्ह्यात बिगर आदिवासी व्यक्तींकडून गरीब आदिवासी व्यक्तींच्या अशिक्षितपणाचा फायदा घेत त्यांच्या जमिनी खरेदी करण्यात येत असून स्थानिक जिल्हा प्रशासन व महसूल विभातील काही अधिकारी संगनमत व आर्थिक व्यवहार करून या गैरव्यवहारास मान्यता देत असल्याचे उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अश्याच एका प्रकरणात जिल्हाधिकारी, धुळे यांना राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोगाने दिनांक ०६ एप्रिल, २०२३ रोजी नोटीस बजावली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी काय आढळून आले तसेच आदिवासींची जमीन बळकावणाऱ्यांवर व त्यांना सहकार्य करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच बिगर आदिवासींनी खरेदी केलेली जमीन मूळ आदिवासींना परत करण्यात येणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (२२-०२-२०२४) :** (१) हे खरे नाही.

आदिवासी खातेदाराच्या व्यक्तीने धारन केलेली नविन अविभाज्य शर्तीची जमीन बिगर आदिवासी व्यक्तीस विविध प्रयोजनार्थ प्रदान करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त झाल्यानंतर प्रस्तावाची शासनस्तरावर तपासणी करण्यात येवून महाराष्ट्र जमीन महसूल संहिता-१९६६ चे कलम कलम ३६-अ नुसार अनुसूचित जमातीतील व्यक्तींकडून जमातेतर व्यक्तींकडे जमिनींचे हस्तांतर विषयक तरतूदी तसेच महाराष्ट्र जमीन महसूल (जनजातीच्या व्यक्तींनी जनजातीतर व्यक्तींकडे भोगाधिकार हस्तांतरित करणे) नियम, १९७५ च्या नियम ४(१) मधील तरतूदीनुसार, विहित अटी व शर्तींस अधीन राहून शासनस्तरावरुन परवानगी देण्यात येते.
(२) होय हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, धुळे यांनी त्यांच्या कार्यालयाच्या पत्र क्र F/Section-६/WS/३९३/२०२३ अन्वये राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोग, नवी दिल्ली यांच्याकडे अंतरिम अहवाल सादर केलेला आहे. याबाबत तहसिलदार शिरपूर यांच्याकडून चौकशी सुरु असून सदर चौकशी पूर्ण झाल्यानंतर आयोगास अंतिम अहवाल सादर करण्यात येईल.
(४) अशी बाब नाही.

---

## चाळीसगाव व भडगाव (जि.जळगाव) तालुक्यातील ७५४२ हेक्टर क्षेत्र सिंचनापासून वंचित असल्याबाबत

**(७) २१८५३ (०५-०१-२०२४) श्री.एकनाथराव खडसे : तारांकित प्रश्न क्रमांक १९२८० ला दिनांक १७ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाळीसगाव व भडगाव (जि.जळगाव) तालुक्यातील शेतकऱ्यांना लाभ देणारे वरखेडे लोंढे प्रकल्पाचे मुख्य धरणाचे काम पूर्ण झाले असून मौजे पिलखोड (ता.चाळीसगांव) येथील १९.६९ हे.आर. खाजगी क्षेत्राचा भूसंपादन करणे प्रस्तावित असून तामसवाडी गावठाणातील कुटुंब सर्वेक्षण व गणना सर्वेक्षण प्रगतीपथावर असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वितरण प्रणालीचे कामास अद्यापपावेतो सुरुवात झालेली नसल्यामुळे दोन्ही तालुक्यातील ३१ गावांतील ७५४२ हेक्टर क्षेत्र सिंचनापासून वंचित असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त वितरण प्रणालीचे काम तातडीने सुरु करणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०२४) :** (१) होय हे खरे आहे.
तामसवाडी गावठाणातील कुटुंब सर्वेक्षण व गणना सर्वेक्षणाची प्रक्रिया पूर्ण झाली आहे.
(२) हे खरे आहे.
बंदिस्त नलिकेद्वारे सिंचन वितरण प्रणालीच्या संकल्पन व अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली असून सदर कामाची निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.
(३) जलसंपदा विभागाच्या प्रचलित नियमानुसार सदर कामाची निविदा स्विकृती प्रक्रिया शासनस्तरावर प्रगतीपथावर आहे. सदर निविदा स्विकृतीनंतर कार्यारंभ आदेश देऊन लाभक्षेत्रासाठी सिंचन वितरण प्रणालीचे काम बंद नलिकेद्वारे पुढील दोन वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगाव जिल्ह्यात केळी पिकांवर कुकंबर मोझॅक व्हायरस (सीएमव्ही) या विषाणूजन्य रोगामुळे झालेल्या नुकसानीची शेतकऱ्यांना भरपाई देणेबाबत

**(८) २१८५८ (०३-०१-२०२४) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यात केळी पिकांवर गत २-३ वर्षापूर्वी आलेल्या कुकंबर मोझॅक व्हायरस (सीएमव्ही) या विषाणूजन्य रोगामुळे केळी पीक घेणाऱ्याना नुकसान भरपाई देणे, त्यांना फळपीक विमा योजनेचा सरसकट लाभ देणेकामी व (सीएमव्ही) या विषाणूजन्य रोगाचा उती संवर्धीत केळी रोपांच्या निर्मिती बी-बियाणे गुण नियंत्रण अधिनियमांतर्गत समावेश करणेसाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व कृषी मंत्री यांचेकडे दिनांक २५ सप्टेंबर, २०२३ रोजी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केळी उत्पादक शेतकऱ्यांना पिकविमा योजनेचा लाभ देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (०२-०२-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) आंबिया बहार २०२२-२०२३ मध्ये जळगाव जिल्ह्यामध्ये केळी फळपिकासाठी ७७,९३४ शेतकऱ्यांनी विमा योजनेत सहभाग नोंदवली आहे, त्यापैकी नुकसान भरपाईस पात्र एकूण ५४,२८९ शेतकऱ्यांना रक्कम रुपये ३९१.५८ कोटी नुकसान भरपाई देय होती. त्यापैंकी ४८,१३९ शेतकऱ्यांना रक्कम रुपये ३५५.६३ कोटीचे वाटप झालेले आहे. उर्वरित शेतकऱ्यांची नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही विमा कंपनीस्तरावर सुरू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जळगाव जिल्ह्यात जलजीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठ्याची कामे अपूर्ण असल्याबाबत

**(९) २१८६९ (०५-०१-२०२४) श्री.एकनाथराव खडसे : तारांकित प्रश्न क्रमांक १९२६९ ला दिनांक २० जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्ह्यात जलजीवन मिशन अंतर्गत गेल्या दीड वर्षात १३५४ पाणीपुरवठा योजनांपैकी केवळ ३३ योजनांचे काम पूर्ण झाले असून १३५१ योजनांची कामे दिनांक ९ ऑगस्ट, २०२३ चे पाहणीनुसार अपूर्णावस्थेत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अपूर्ण असलेली कामे पूर्णत्वास नेण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (०५-०२-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक ०९ ऑगस्ट, २०२३ चे पाहणीनुसार जळगाव जिल्ह्यातील जल जीवन मिशन अंतर्गत १३५४ पाणीपुरवठा योजनांपैकी ३३ योजनांचे काम पूर्ण झालेले असून, ०६ योजनांची चाचणी प्रगतीपथावर आहे.

(२) अपूर्ण कामे पूर्ण करण्याकरीता अंमलबजावणी यंत्रणेमार्फत वेळोवेळी कंत्राटदार व ग्रामपंचायत सोबत बैठका घेण्यात येत असून, तसेच शासन स्तरावर आढावा बैठकांचे आयोजन करून योजना विहीत मुदतीत पूर्ण होण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या मृत्यूची चौकशी करणेबाबत

**(१०) २१९११ (०३-०१-२०२४) श्री.आमश्या पाडवी, श्री.सचिन अहिर, श्री.एकनाथराव खडसे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक १९७७४ ला दिनांक २४ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात गत ५ वर्षांत आदिवासी आश्रमशाळेतील ११४४ विद्यार्थ्यांचा विविध आजाराने मृत्यू झाला असून शासनाने केवळ १०८ मृत्यूंची जबाबदारी घेतली असल्याचे बाब माहे जुलै, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यार्थी तीव्र आजारी झाल्यास औषध उपचार न करता त्यांना पालकाच्या स्वाधीन करून त्याचा घरी गेल्यावर मृत्यू झाल्यास त्याची नोंद किंवा जबाबदारी शाळा प्रशासन घेत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी विद्यार्थ्यांच्या मृत्यूची सखोल चौकशी करुन जबाबदारी न घेणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०८-०१-२०२४) :** (१) हे खरे नाही.
गत ५ वर्षात शासकीय/अनुदानित आश्रमशाळेत एकूण १११३ विद्यार्थी विविध घटना/ कारणांने मृत्यू पावले आहेत. त्यापैकी ९९६ विद्यार्थ्यांचा मृत्यू पालकांच्या ताब्यात असताना झाला आहे व ११७ विद्यार्थ्यांचा मृत्यू शाळेच्या ताब्यात असताना झाला आहे.
(२) हे खरे नाही.
(३) विद्यार्थी मृत्यूच्या अनुषंगाने सविस्तर चौकशी करण्यात येत असून सदर चौकशीत दोषी आढळून आलेल्या कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

## खेराडे-विटा (ता.कडेगाव, जि.सांगली) येथे बंधाऱ्याच्या बांधकामास विलंब होत असल्याबाबत

**(११) २१९१४ (२४-११-२०२३) श्री.गोपिचंद पडळकर : तारांकित प्रश्न क्रमांक १५११५ ला दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेराडे-विटा (ता.कडेगाव, जि.सांगली) येथील गट क्रमांक ४४४ मधील नवीन सिमेंट बंधारा बांधण्याबाबत सन २०२२ मध्ये मा.मृद व जलसंधारण मंत्री यांनी जिल्हा परिषद (ल.पा.) उपविभाग, विटा

यांना आदेश दिले असून सदर कामासाठी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी निधी मंजूर झाल्यानंतर जिल्हा परिषद (ल.पा.) उपविभाग, विटा यांचेकडून दिनांक २३ मार्च, २०२३ रोजी कार्यारंभ आदेश देखील काढण्यात आला, परंतु सदर काम पूर्ण करण्यासाठी देण्यात आलेली ६ महिन्यांची मुदत संपुष्टात येऊनही अद्याप याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बंधाऱ्याचे बांधकाम लवकर पूर्ण करण्यासाठी लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांनी माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केली आहे, तसेच नवीन गेटेड बंधारा कामाचे सविस्तर सर्व्हेक्षण करुन प्रचलित मापदंडानुसार अंदाजपत्रक तयार करुन सदर काम सन २०२२-२३ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेमधुन कार्यवाही करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर बंधारा किती कालावधीत पूर्ण करण्यात येईल तसेच सदर कामास दिरंगाई करणाऱ्या कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड (११-१२-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय. नवीन गेटेड बंधारा कामाचे सविस्तर सर्वेक्षण करुन प्रचलित मापदंडानुसार अंदाजपत्रक तयार करुन सदर काम सन २०२२-२३ मध्ये जिल्हा वार्षिक योजनांमधून मंजूर करण्यात आले आहे.
(३) व (४) सदर कामासाठी जिल्हा जलसंधारण अधिकारी, जि.प. (ल.पा.) विभाग, सांगली यांच्या दिनांक २३/०३/२०२३ रोजीच्या कार्यारंभ आदेशान्वये श्री.अमोल कृष्णराव देशमुख, रा.देवराष्ट्रे, ता.कडेगाव ही यंत्रणा निश्चित केली आहे. सदर बंधाऱ्याचे रेखांकन देणेसाठी जलसंधारण अधिकारी, मक्तेदार समक्ष दिनांक २९/०३/२०२३, दिनांक ०८/०४/२०२३ दिनांक २१/०४/२०२३ रोजी कामाच्या स्थळी गेले असता, सदर बंधाऱ्याच्या ठिकाणी ओढापात्रात पाणी वाहत असलेचे निदर्शनास आले. सदरच्या ओढ्यामध्ये टेंभू योजनेच्या आवर्तनामुळे तसेच त्यांनतरच्या अवकाळी पावसाने ओढापात्रात पाणी वाहत होते व सध्या तेथे पाणी आहे. यासंदर्भात जिल्हा जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद (ल.पा.) विभाग, सांगली व तत्कालीन उपविभागीय जलसंधारण अधिकारी यांनी ग्रामस्थ व मक्तेदार यांचे सोबत दिनांक १०/०५/२०२३, ३१/०८/२०२३, १२/०९/२०२३, १४/०९/२०२३, १२/१०/२०२३, २७/१०/२०२३, ०२/११/२०२३, २५/११/२०२३ रोजी प्रस्तावित बंधाऱ्याच्या ठिकाणी भेट देऊन पाहणी केली आहे.

प्रस्तावित बंधाऱ्याचे ठिकाणी असणाऱ्या ओढापात्रात सद्य:स्थितीत पाणी असून पाणी कमी होताच सदर काम पूर्ण करण्यात येईल.

---

## दि ब्रिजलाल बियाणी क्रेडीट को.ऑप.सोसायटी लि., अकोला संस्थेच्या स्थावर मालमत्ता विक्री प्रकरणामध्ये आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१२) २१९३७ (२९-११-२०२३) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दि ब्रिजलाल बियाणी क्रेडीट को.ऑप.सोसायटी लि., अकोला र.नं.३१३ (अवसायानात) या संस्थेची स्थावर मालमत्ता कोठारी संकुल सहकार नगर, गौरक्षण रोड, अकोला सर्व्हे नं.१६ मधील दुकान क्र. १४ व

१५ या दोन दुकानांची मालमत्ता ही सहकार विभाग व सहकार आयुक्त यांचे दिनांक २३ एप्रिल, २०२१ व दिनांक १५ जुलै, २०२१ च्या मालमत्ता विक्री संदर्भातील धोरणांचे शासन निर्णय परिपत्रकानुसार ई-निविदा प्रक्रिया न राबविता ऑफलाईन पध्दतीने सिलबंद लिफाफा पध्दतीद्वारे विकली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संस्थेच्या मालमत्तेचे ७/१२ व फेरफार वरील क्षेत्रफळ हे २९५.९० चौ.मी. इतके क्षेत्रफळ ७/१२ वर नमूद असताना अवसायक तथा अवसायक मंडळ तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अकोला यांनी २२५.४२ चौ.फूट या कमी क्षेत्रफळाची सिलबंद निविदा मागवून २९५.९० चौ.फूट इतक्या जास्त क्षेत्रफळाची खरेदी करुन दिली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर संस्थेच्या नियमबाह्यरित्या मालमत्ता विक्री केलेल्या प्रकरणामध्ये सहकार आयुक्त, पुणे दक्षता कक्ष येथे तक्रार केलेली असून सदर तक्रारीची चौकशी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांच्यामार्फत सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी अहवालात काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (०७-१२-२०२३) :** (१) खरे आहे.

सहकार आयुक्तांच्या दिनांक ०२/०३/२०२३ रोजीच्या आदेशान्वये सर्व प्रकारच्या सहकारी संस्था तसेच अवसायनातील आणि नोंदणी रद्द झालेल्या सहकारी संस्थांची रुपये ३.०० लाखावरील मुल्य असलेल्या मालमत्ता ऑनलाईन पध्दतीनेच विक्री करणेकरीता आदेशित केले आहे.

परंतु, सहकार आयुक्त कार्यालयाच्या दिनांक २३/०४/२०२१ च्या परिपत्रकानुसार व दिनांक १५/०७/२०२१ च्या शुद्धिपत्रकानुसार सहकारी संस्थांच्या ऑनलाईन मालमत्ता विक्री करीता दोन कार्यप्रणालीवरच विक्री करण्यात यावी असे निर्देशित केलेले आहे. तथापि, अवसायनातील सहकारी संस्थांची मालमत्ता ऑफलाईन विक्री करणेकरीता कोणतेही प्रतिबंध लागू करण्यात आले नव्हते. त्यामुळे दि ब्रिजलाल बियाणी क्रेडीट को-ऑपरेटीव्ह सोसायटी लि., अकोला (अवसायनात) या संस्थेची मालमत्तेची विक्री नियमानुसार सर्व प्रक्रीया राबवुन राज्यस्तरीय वृत्तपत्रात जाहीरात देऊन ऑफलाईन पध्दतीने करण्यात आली आहे.
(२), (३) व (४) अवसायकामार्फत सुरवातीला पुर्वीच्या खरेदीखतात नोंदविलेले अधिकचे क्षेत्रफळ दर्शवुन खरेदीखत करुन देण्यात आले होते. तथापि, त्यानंतर दुय्यम निबंधकाकडे यासंबंधीचा दुरुस्तीलेख करण्यात आलेला आहे. सदर मालमत्तेची विक्री नियमबाह्यरित्या झालेली नाही. तथापि, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदर तक्रार विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपुर यांचेकडे चौकशीस्तव पाठविली आहे.

सदर चौकशी अहवालात मालमत्तेची विक्री करतांना अधिकाऱ्याकडुन क्षेत्रफळाच्या नोंदीबाबत हलगर्जीपणा झाल्याचे निष्पन्न झाले. त्यानुषंगाने संस्थेचे अवसायक श्री.एस.डब्ल्यु. खाडे, सहाय्यक निबंधक (प्रशासन) यांचे विरुध्द विभागीय चौकशीचा प्रस्ताव २६/०९/२०२३ रोजी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे सादर करण्यात आला आहे. त्यानुसार संबंधित अधिकारी यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (सेवानिवृत्ती) नियम, १९८२ च्या नियम २७(२)(ब)(एक) अन्वये

तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ च्या नियम ८ मधील तरतुदीनुसार चौकशीचे ज्ञापन दिनांक ०७/११/२०२३ रोजी निर्गमित केले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र इन्स्टिटयूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन या संस्थेची स्थापना करण्याबाबत

**(१३) २१९६९ (०९-०१-२०२४) ॲड.अनिल परब : दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ९ मधील प्रश्न क्रमांक १६०५० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाच्या निती आयोगाच्या धर्तीवर राज्यात महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्र) या संस्थेची स्थापना दिनांक ११ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर राज्याच्या विकासाला धोरणात्मक, तांत्रिक तसेच कार्यात्मक दिशा देणारा विचार गट (Think Tank) म्हणून "मित्र" ही संस्था कार्यरत असून या संस्थेचे स्वरूप काय आहे व संस्थेकडे कोणते काम देण्यात आले आहेत, संस्थेचे अध्यक्ष व सदस्य कोण आहेत, तसेच या संस्थेच्या कार्यालयासाठी कोठे व कोणत्या अटीवर कार्यालय देण्यात आले आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (१७-०२-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) केंद्र शासनाच्या निती आयोगाच्या धर्तीवर राज्यात महाराष्ट्र इन्स्टिटयूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन-मित्र या संस्थेची स्थापना दिनांक ११/११/२०२२ रोजी करण्यात आलेली आहे.

या संस्थेकडे पुढील कार्ये सोपविण्यात आलेली आहेत :-
"मित्र" ची कार्ये-

१) राज्याच्या विकासाला धोरणात्मक, तांत्रिक तसेच कार्यात्मक दिशा देणारा विचार गट (Think Tank) म्हणून कार्य करणे.

२) राज्याचे निर्धारित उद्दीष्ट साध्य करण्याच्या हेतूने शासनाच्या विविध विभागांना सक्षम करण्यासाठी उपाययोजना करणे.

३) विविध विभाग, भारत सरकार, निती आयोग, सिव्हिल सोसायटी, विविध अशासकीय संस्था तसेच खाजगी व्यावसायिक संस्था यांच्यात संवाद घडवून आणून विकासाच्या नवीन उपाययोजना सुचविणे.

४) "मित्र" द्वारे कृषी व संलग्न क्षेत्र, आरोग्य व पोषण, शिक्षण, कौशल्य विकास व नाविन्यता, नागरीकरण व बांधकाम क्षेत्र विकास आणि भूमी प्रशासन, वित्त, पर्यटन आणि क्रिडा, ऊर्जा संक्रमण आणि वातावरणीय बदल, उद्योग आणि लघु उद्योग, पायाभूत सुविधा, माहिती तंत्रज्ञान, पूरक सेवा व दळणवळण या १० क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करणे तसेच पर्यावरण, वने आणि वन्यजीव संरक्षण या क्षेत्रांवर देखील विशेष लक्ष देणे.

५) या क्षेत्रांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व संनियंत्रणासाठी पूरक असणारे नाविन्यपूर्ण क्षेत्र- ड्रोन टेक्नॉलॉजी, कृत्रिम बुध्दीमत्ता (Artificial Intelligence) व मशिन लर्निंग, Internet of Things (IOT), Cloud Coumputing, सायबर सुरक्षा (Cycber Security), Robotics, GIS, Block chain यांचा वापर करणे.

६) आकांक्षित तालुका/शहरे उपक्रम राबविणे. या उपक्रमांद्वारे तुलनेने कमी प्रगती असलेल्या तालुका/ शहरांमध्ये नियोजनबध्द कार्यक्रम/योजना राबविणे तसेच त्यांच्या प्रगतीचा वेळोवेळी आढावा घेणे.

७) राज्य शासनाच्या विविध विभागांना मदत करीत असताना स्थानिक पातळीवरील नियोजन आणि विकासात्मक कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत सुधारणा करण्यासाठी जिल्ह्यांना डेटा ॲनालिटिक्सच्या माध्यमातून सहाय्य करणे. अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांची कार्यक्षमता सुधारण्यासाठी परिणाम आधारित रिअल-टाईम मुल्यांकनाच्या माध्यमातून मदत देणे आणि समवर्ती अभिप्राय प्रदान करणे.

“मित्र” या संस्थेच्या नियामक मंडळाची रचना पुढीलप्रमाणे आहे :-

| | | |
|---|---|---|
| मा.मुख्यमंत्री | : | अध्यक्ष |
| मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन)/ | : | सह अध्यक्ष |
| उपमुख्यमंत्री (गृह)- शासनाने नामनिर्देशित केलेले उपाध्यक्ष-२ | : | उपाध्यक्ष -२ |
| मुख्य सचिव | : | सदस्य |
| अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, | : | सदस्य |
| वित्त विभाग अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, | : | सदस्य |
| नियोजन विभाग तज्ञ व्यक्ती (६-त्यापैकी ३ वैधानिक | : | सदस्य-६ |
| विकास मंडळाचे प्रतिनिधी) मुख्य कार्यकारी अधिकारी-मित्र | : | सदस्य सचिव |

“मित्र” या संस्थेच्या कार्यकारी मंडळाची रचना खालीलप्रमाणे आहे :-

| | | |
|---|---|---|
| मुख्य कार्यकारी अधिकारी | : | अध्यक्ष |
| विकास क्षेत्र प्रमुख (Sectoral Experts)(१०) | : | सदस्य (१०) |
| संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय | : | सदस्य |

कार्यालयीन जागा :-

“मित्र” या संस्थेच्या कार्यालयासाठी एक्सपोर्ट क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन या केंद्र शासनाच्या अखत्यारितील महामंडळाकडून, निर्मल बिल्डिंग, ५ वा मजला, नरीमन पॉईंट, मुंबई-४०००२१ येथील जागा भाडे तत्वावर घेण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गडचिरोली जिल्ह्यातील गिरणी मालकांवर कारवाई करण्यात दिरंगाई होत असल्याबाबत

**(१४) २२०५८ (२२-११-२०२३) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास महामंडळाच्या सन २०२२-२३ या वर्षात धान भरडाईत गैरव्यवहार केल्याप्रकरणी व्यवस्थापकीय संचालक यांनी गडचिरोली जिल्ह्यातील ४१ राईस मिल धारकांवर व गडचिरोलीचे प्रादेशिक व्यवस्थापकावर कारवाई करण्याचे आदेश दिल्याची बाब दिनांक ९ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी विकास महामंडळ आणि जिल्हा मार्केटिंग फेडरेशनच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या खरेदीतील तांदुळ हा अन्न व नागरी पुरवठा विभागाला न देता परस्पर मार्केट मध्ये विकून निकृष्ट दर्जाचा तांदुळ अन्न व नागरी पुरवठा विभागाकडे देण्यात येत असून यामध्ये शासनाची करोडो रुपयाची फसवणूक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने निकृष्ट दर्जाचा तांदुळ पुरवठा करणाऱ्या ४१ राईस मिल्सच्या मालकांवर तसेच यामध्ये दोषी असलेल्या संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०७-१२-२०२३) :** (१) होय.

(२) व (३) सदर बाबत महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने महामंडळाने चौकशी समिती नेमली होती. सदर चौकशी समितीच्या अहवालानुसार ७ राईस मिलर्सनी केलेली भरडाई संशयास्पद असल्याचे आढळून आल्याने संबंधित राईस मिलर्सवर कायदेशीर कारवाई करणेबाबत महामंडळाने दिनांक ०५/१०/२०२३ रोजी मा.जिल्हाधिकारी, गडचिरोली यांना कळविले आहे.

गैरव्यवहार व अनियमिततेसाठी जबाबदार तत्कालीन प्रादेशिक व्यवस्थापक श्री.कोटलवार यांचेवर महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाने दिनांक ०८/०८/२०२३ रोजीच्या आदेशान्वये निलंबनाची कार्यवाही केलेली आहे. तसेच महामंडळाने दिनांक ०९/१०/२०२३ रोजीच्या पत्रान्वये विद्यमान प्रादेशिक व्यवस्थापक गडचिरोली यांच्यामार्फत पोलीस स्टेशन गडचिरोली येथे गुन्हा दाखल करणे बाबत कळविलेले असून प्रादेशिक व्यवस्थापक गडचिरोली यांनी गुन्हा दाखल करणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात पशुवैद्यकीय सेवांवरचे शुल्क माफ करण्याबाबत

**(१५) २२१७६ (०३-०१-२०२४) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पुशवैद्यकीय सेवा व इतर विविध सेवांसाठीच्या सेवाशुल्क वाढ करण्यात आल्याने पशुपालक व शेतकऱ्यांना वाढलेल्या पशुखाद्य किंमती, दुधाला मिळणारा कमी दर आणि वाढता औषधोपचार खर्च परवडत नसल्याने सेवाशुल्क माफ करावे अशी मागणी केल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ च्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी पशुवैद्यकिय सेवांवर शुल्क माफ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१३-०२-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) शासन निर्णय दिनांक २३/०५/२०२२ अन्वये पशुवैद्यकीय दवाखान्यांमधून दिल्या जाणाऱ्या पशुवैद्यकीय सेवांसाठी आकारण्यात येणारे सेवाशुल्क हे प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चाच्या तुलनेत अतिशय नाममात्र आहे.

---

## नझुल जमिनीबाबत जाहीर केलेल्या धोरणानुसार लीज नुतनीकरणात येणाऱ्या अडचणींबाबत

**(१६) २२२२० (०३-०१-२०२४) श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.निलय नाईक, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर विभागातील नझुल भूखंड धारकांच्या जमिनीबाबत दिनांक २ मार्च, २०१९ रोजी जाहीर केलेला शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.जमीन २४९९/प्र.क्र.१२५/८ दिनांक २३/१२/२०१५ नुसार शर्तभंगाच्या दंड आकारणीमध्ये सुसूत्रता नसून अवाजवी दंड आकारला जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत मा.महसूल मंत्री यांनी हिवाळी अधिवेशन, २०२२ दरम्यान बैठक घेऊन अहवाल सादर करण्याचे आदेश दिले असताना तसेच अनेकवेळा बैठका होऊनही अद्याप शासन निर्णय जाहीर झाला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बांधकाम पूर्व परवानगी न घेतल्याने आदेशाच्या दिनांकास प्रचलित दराच्या २.५ टक्के रक्कम आकारणे हे वस्तुतः योग्य नसून, शर्तभंग दंड हा बांधकाम केलेल्या दिनांकाच्या दरानुसार आकारावा अशी सुधारणा लोकप्रतिनिधींनी तसेच भूखंड धारकांनी लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०२-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) मा.मंत्री (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली नझुल जमिनीबाबत दिनांक २७/१२/२०२२ व दिनांक २४/०७/२०२३ रोजी बैठका आयोजित करण्यात आल्या.

मा.मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २४/०७/२०२३ रोजी विधानमंडळ, मुंबई येथील आयोजित बैठकीतील निर्णयानुसार, नझुल जमिनीबाबतच्या धोरणांच्या अनुषंगाने शर्तभंग प्रकरणे, निवासी

प्रयोजनार्थ भूभाडे आकारणे तसेच भोगवटादार वर्ग-१ निवासी प्रयोजनाकरीता आकारण्यात येणाऱ्या रुपांतरीत मूल्य दरात सुधारणा करण्याबाबत देण्यात आलेल्या निर्देशानुसार, भाडेतत्वावर दिलेल्या नझुल जमिनी संदर्भातील मुद्यांबाबत सर्वकष अभ्यास करुन शासनास शिफारस करण्यासाठी विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०९/११/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली आहे.

(३) व (४) मा.लोकप्रतिनिधीनी केलेल्या मागणीस अनुसरुन दिनांक ०९/११/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीस अभ्यास करुन दोन महिन्यात शासनास अहवाल सादर करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.

---

## चंद्रपूर जिल्ह्यात परवानाधारक खत विक्रेत्यांना रासायनिक खताचा काळाबाजार रोखण्याच्या दृष्टीने कार्यवाही करणेबाबत

**(१७) २२५४४ (२९-११-२०२३) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यात परवानाधारक खत विक्रेत्यांना रासायनिक खताचा काळाबाजार रोखण्याच्यादृष्टीने पॉस उपकरणे वापरणे आवश्यक असताना त्या उपकरणाचा वापर न करता रासायनिक खतांची विक्री केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रासायनिक खतांची विक्री काळयाबाजारात झाल्यामुळे महसूलाचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पॉस उपकरणांचा वापर न करता खतांची विक्री करणाऱ्या संबंधित परवाना धारकांचा परवाना रद्द करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (०८-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) ई-पॉस उपकरणांचा वापर न करता अनुदानित रासायनिक खतांची विक्री झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील ५० कोटी वृक्षांच्या लागवड मोहिमेबाबत

**(१८) २२५८१ (२९-११-२०२३) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) येथे सन २०१६ ते २०१९ या तीन वर्षांच्या कालावधीत मुरबाड पूर्व, मुरबाड पश्चिम, टोकावडे उत्तर, टोकावडे दक्षिण या वनपरीक्षेत्रात ५० कोटी वृक्षांची लागवड योजनेतून मित्र वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट राबविण्यात आले असून सदर योजनेत सागवान, ऐन, खैर, आवळा, जांभूळ या वृक्षांच्या लागवडीसाठी बाहेरून रोपे मागून त्यांच्या लागवडीसाठी खड्डे खोदणे, मजुर लावून लागवड करणे, या

वृक्षांची देखभाल, उन्हाळी संरक्षण, वेळोवेळी पाणी देण्यासाठी, त्यांची राखण करणे, निगा राखणे, यासाठी राखणदार ठेवणे, लावलेल्या रोपांना खत औषध फवारणी आणि वृक्ष संवर्धनासाठी महाराष्ट्र वनविभागाने या चारही वन विभागांना सतत तीन वर्षे निधी उपलब्ध करून दिला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वन अधिकाऱ्यानी केलेल्या दुर्लक्षामुळे तसेच सतत होणाऱ्या लाकूडतोडीमुळे मुरबाड तालुक्यातील बारवी धरणाचा वनपट्टा, माळशेज घाटातील वनसंपदा, भीमाशंकर अभयारण्यातील मिल्हे, देहरी, खोपिवली, जायगाव तसेच पाटगाव, पठार, हरिश्चंद्रगड परिसर, गोरखगड, सिध्दगड येथील वनसंपदेचा ऱ्हास झाला असून उक्त चारही वनपरिक्षेत्रातील लावलेल्या झाडांच्या जागी ओसाड माळरान दिसून येत असल्यामुळे जंगलावरच आपली उपजीविका करणाऱ्या आदिवासी बांधवांसाठी काम करणाऱ्या आदिवासी क्रांती सेनेने "झाडे दाखवा दहा हजार मिळवा" असे आवाहन करून तीन वर्षांपूर्वी वृक्ष लागवड केलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तसेच चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषी वन अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (११-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) हे खरे नाही.

मुरबाड तालुक्यातील मुरबाड पूर्व, मुरबाड पश्चिम, टोकावडे उत्तर, टोकावडे दक्षिण या ४ वनक्षेत्रांत ५० कोटी वृक्ष लागवडीअंतर्गत घेण्यात आलेल्या रोपवनांची सद्य:स्थिती ही वन विभागाच्या प्रचलीत कार्यपध्दतीनुसार केलेल्या नमूना तपासणीत विहित मानकाप्रमाणे असल्याचे आढळले.

मुरबाड तालुक्यातील बारवी धरणाचा वनपट्टा, माळशेज घाटातील वनसंपदा, भीमाशंकर अभयारण्यातील मिल्हे देहरी, खोपिवली, हरिश्चंद्रगड परिसर, गोरखगड पार्टे, सिध्दगड येथील वनसंपदेचा ऱ्हास झाल्याचे व सदर ठिकाणी ओसाड व माळ रान झाल्याचे दिसून आले नाही. तसेच जंगलावर आपली उपजीविका करणाऱ्या आदिवासी बांधवांसाठी काम करणाऱ्या आदिवासी क्रांती सेनेने "झाडे दाखवा दहा हजार मिळवा" असे आवाहन करून तीन वर्षांपूर्वी वृक्ष लागवड केलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केल्याची बाब विभागाच्या निदर्शनास आलेली नाही. त्यामुळे दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाला भेट देण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांसाठी ऑनलाईन सफारीचे बुकिंग करणाऱ्या कंपनीने शासनाची फसवणूक केल्याबाबत

**(१९) २२६०२ (२९-११-२०२३) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात (जि.चंद्रपूर) येणाऱ्या पर्यटकांना जंगल सफारीचे ऑनलाईन बुकिंग करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या चंद्रपूर वाईल्ड कनेक्टिव्हिटी सोल्यूशन कंपनीने शासनाची करोडो रुपयांची फसवणुक केल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीने जंगल सफारीसाठी करण्यात येणाऱ्या बुकींगचे दिनांक १० डिसेंबर, २०२१ ते दिनांक १७ ऑगस्ट, २०२३ या कालावधीत त्यांच्या खात्यात जमा झालेल्या रुपये २२ कोटी, ८० लाख, ६७ हजार, ७४९ ही संपूर्ण रक्कम शासनाकडे जमा न करता रुपये १० कोटी ६५ लाख १६ हजार ९१८ एवढीच रक्कम जमा करुन उर्वरित रुपये १२ कोटी, १५ लाख, ५० हजार, ८३१ जमा करण्यात आली नसल्याची बाब लेखापरिक्षण अहवालामध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कंपनीसोबत असलेल्या अधिकाऱ्यांच्या आर्थिक हितसंबंधांमुळे महाऑनलाईनच्या माध्यमातुन सुरु करण्यात आलेले ऑनलाईन बुकिंग बंद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्याअनुषंगाने शासनाची करोडो रुपयांची फसवणूक केल्या प्रकरणी कंपनीच्या संचालक व दोषी अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (११-१२-२०२३) :** (१), (२), (३) व (४) ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील जंगल सफारीच्या प्रवेशासाठी ऑनलाईन बुकींगची सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता महाऑनलाईन लिमीटेड व क्षेत्र संचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर यांच्यामध्ये करारनामा करण्यात आला होता. सदर कंपनी करारनाम्यानुसार सेवा देत नसल्याने आणि वेबसाईटमध्ये होणाऱ्या संशयास्पद व्यवहाराबाबत सुधारणा करत नसल्यामुळे सदर करारनामा रद्द करण्यात आला.

तद्नंतर ऑनलाईन बुकींग सेवा देण्याकरीता वाईल्ड कनेक्टिव्हिटी सोल्यूशन, चंद्रपूर या कंपनीशी करारनामा करुन नवीन स्वतंत्र वेबसाईट तयार करण्यात आली होती. तथापि, विशेष लेखा परिक्षणामध्ये सफारी बुकींगद्वारे शासनास तसेच जिप्सीमालक व मार्गदर्शक यांना प्राप्त होणाऱ्या रकमेमध्ये तफावत आढळून आल्यामुळे सदर करारनामा दिनांक ०३/०८/२०२३ रोजी खंडीत करुन तद्नंतर उक्त कंपनीमार्फत देण्यात आलेली ऑनलाईन सफारी बुकींगची सेवा बंद करण्यात आली आहे. सदर प्रकरणी रामनगर पोलीस ठाणे, चंद्रपूर येथे दिनांक १८/०८/२०२३ रोजी प्रथम गुन्हा रीपोर्ट क्रमांक ९३७/२०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आर्थिक गुन्हे शाखा, चंद्रपूर यांचेमार्फत सदर प्रकरणाचा तपास सुरु आहे. तसेच सदर कंपनीचा काळ्या यादीत समावेश करण्यात आला आहे.

उक्त प्रकरणी मा.उच्च न्यायालयात दाखल याचिकेतील अंतरीम आदेशानुसार सदर कंपनीने रुपये ३.०० कोटीचा भरणा ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प प्रतिष्ठानाच्या खात्यामध्ये केला आहे व फरकाच्या रकमेच्या वसुलीकरीता लवाद प्रकरण मा.उच्च न्यायालय, नागपूर येथे न्यायप्रविष्ट आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## छत्रपती संभाजीनगर जिल्हा सहकारी दुध संघाच्या कामकाजाची उच्चस्तरीय समितीमार्फत चौकशी करण्याबाबत

**(२०) २२८१९ (२९-११-२०२३) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर जिल्हा सहकारी दूध संघात गत वर्षभरात १६ हजार लिटर दुधाची घट झाल्याचे तसेच २ कोटी १८ लाख लिटर दूध संकलनातील १ कोटी ९ लाख ८३ हजार लिटर दूध पिशवी बंद करुन,

१ कोटी २ लाख लिटर टँकरने भरुन विक्री केल्याचे लेखापरिक्षण अहवालात नमूद असून ६ लाख लिटर दुधाचा वार्षिक अहवालात उल्लेख नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दूध संघाने दोन टक्के राखीव निधी सहकारी बँकेत ठेवणे बंधनकारक असताना दूध संघामार्फत असा कोणताही निधी सहकारी बँकेत राखीव ठेवण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा सहकारी दूध संघाच्या कामकाजाची उच्चस्तरीय समितीमार्फत चौकशी करून पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०८-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) संघाचा राखीव निधी हा दिनांक ३१/०३/२०२३ अखेर रुपये २,७५,७५,१२९/- हा सन २०२२-२३ च्या वार्षिक अहवालात दर्शविलेला आहे. सदर राखीव निधी हा रुपये १,३५,३६,३२३/- इतकी मुदत ठेव स्वरुपात जनता सहकारी बँक लि., पुणे, शाखा जालना रोड, छत्रपती संभाजीनगर येथे गुंतविण्यात आलेला आहे.
(३) व (४) सदर निधीचे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७९ अअ (१) मधील तरतुदीनुसार दुध संघाने तात्काळ संबंधित जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत राखीव निधीचे स्वतंत्र खाते उघडून लेखापरिक्षण अहवालात नमूद राखीव निधीची रक्कम जमा करावी याबाबत विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध) यांनी संघाला निर्देशित केले आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.